पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ५

**सभावृत्तांत**

**दिनांक – ०९/०८/२०१९ वेळ - सकाळी ११.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०९/०८/२०१९** रोजी सकाळी **११.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.तुषार रघुनाथ हिंगे - सभापती**
२. मा.अभिषेक गोविंद बारणे
३. मा.बाबासाहेब(बाबा)त्रिभुवन
४. मा.सागर बाळासाहेब गवळी

या शिवाय मा.आष्टीकर – सहा.आयुक्त , मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) मनपाचे उद्यानात व मैदानात ओपन जीमचे साहित्य खरेदी करणेबाबत.
विषय क्र.३) मनपा परिसरातील क्रीडा सुविधा व सीमा भिंतीवर थ्रीडी पेंटींग करणेकामीचे खर्चास मान्यता घेणेबाबत. – मा.सागर गवळी ,मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव.

----------

ठराव क्रमांक – १८ विषय क्रमांक – ०१
दिनांक – ०९/०८/२०१९ विभाग - क्रीडा
सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.सागर गवळी
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/४/कावि/३३४/२०१९, दि.३१/०७/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१९-२० आयोजित करणेस, पंच मानधन,पंच चहा अल्पोपहार खर्च,नारळ,पूजा खर्च,सत्कारार्थ पुस्तके/रोपे खरेदी, स्टेशनरी खर्च, स्पर्धेकामी पी.व्ही.फ्लेक्स बॅनर,फक्की, क्रीडा साहित्य खरेदी कोटेशन/निविदा पद्धतीने करणे, स्पर्धा आयोजन सभा उपस्थित क्रीडा शिक्षक, पदाधिकारी, पाहुणे यांचा चहापान-अल्पोपहार खर्च, साहित्य भाडेपोटी खर्च,प्रेक्षागृह भाडे इतर खर्च इ.,सन २०१९-२० मध्ये विभागस्तर स्पर्धेसाठी म.न.पा. शाळेतील अंदाजे १५० विद्यार्थी खेळाडू व राज्य पातळीवर ७५,राष्ट्रीय पातळीवर २५ शालेय खेळाडू,त्यांचे समवेत जाणारे क्रीडा शिक्षक व व्यवस्थापक यांचे प्रवास खर्च,दैनिक भत्ता,प्रवेश फी, औषध खर्च इ. अदा करणे कामी अंदाजे र.रु.१,००,०००/- असे एकूण येणा-या संभाव्य खर्च र.रु.३०,४६,६६०/-(अक्षरी र.रू.तीस लाख शेहेचाळीस

हजार सहाशे साठ फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१९-२० अनुषंगाने येणारा खर्च हा प्रस्तावात नमुद अ.क्र.१ ते ३ हा क्रीडा निधी- वार्षिक स्पर्धा क्रीडा कला, म.न.पा. तर्फे आयोजित विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षांवर व अ.क्र. ३ ते ७ हा खर्च क्रीडानिधी - क्रीडा कला साहित्य या लेखाशिर्षावर केलेल्या एकूण तरतूद र.रु. ५०,००,०००/- मधून खर्ची टाकणेस तसेच शासकीय जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०१९-२० अनुषंगाने स्टेज,टेबल खुर्च्या, मैदान तयार करणे, ध्वनी/विद्युत व्यवस्था व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे इ. स्वरुपाचा खर्च हा संबंधित क्षेत्रीय कार्यालयामार्फत होणार आहे. त्यासाठी प्रत्यक्ष येणारा खर्च संबंधित विभाग, संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांच्या अंदाजपत्रकातुन खर्ची टाकण्यास मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – १९ विषय क्रमांक – ०२
दिनांक – ०९/०८/२०१९ विभाग - क्रीडा
सुचक – मा.सागर गवळी अनुमोदक – बाबासाहेब त्रिभुवन
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/९/कावि/३१८/२०१९, दि.०८/०८/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध उद्याने व मैदाने याठिकाणी ओपन जिम साहित्य बसविणेकामी सन्माननीय नगरसदस्य व नगरसदस्या यांनी मागणी प्रत्रा द्वारे मागणी केलेली आहे. त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या मागणीपत्रानुसार, एकून ८५ उद्याने व मैदाने या ठिकाणी ८ सेटचे ओपन जीमचे साहित्य खरेदी करुन बसविणेकामी येणा-या अंदाजे र.रू.४,९९,२६,७०५/-(अक्षरी र.रू. चार कोटी नव्याण्णव लाख सव्वीस हजार सातशे पाच फक्त) चे खर्चास किंवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास क्रीडा विभागाकडील “क्रीडा व्यायाम साहित्य खरेदी ”या लेखाशिर्षावरील उपलब्ध तरतूदीच्या मर्यादेत व शिल्लक तरतुद उपलब्ध झाल्यानंतर त्यामधून ओपन जिमचे साहित्य मध्यवर्ती भांडार विभागाकडुन GEMपोर्टलवर प्रसिध्द करून खरेदी करणेस येणा-या खर्चास मान्यता घेणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २० विषय क्रमांक – ०३
दिनांक – ०९/०८/२०१९
सुचक – मा.सागर गवळी अनुमोदक – मा.अभिषेक बारणे
संदर्भ – मा.सागर गवळी, मा.अभिषेक बारणे यांचा प्रस्ताव -

मनपाच्या ८ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत विविध क्रीडा सुविधा राबविल्या जातात. सदर क्रीडा सुविधा व क्रीडा सुविधा सीमा भिंतीवर विविध खेळांचे बोधचिन्हे, अक्शन छायाचित्रे, थ्रीडी पेंटींग

मध्ये केल्यास क्रीडा सुविधांचा प्रचार व प्रसार होण्यास मदत होईल. सबब मनपा परिसरातील क्षेत्रीय कार्यालयांतर्गत संबंधित स्थापत्य विभागाकडून क्रीडा सुविधा व सीमा भिंतीवर विविध खेळांचे थ्रीडी पेंटींग करुन घेणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( तुषार रघुनाथ हिंगे )**
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/३/कावि/२७७/२०१९
दिनांक : ०९/०८/२०१९



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.